# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष : १ । अंक : ३ । मे २०१८ (मासिक) । मूल्य ₹ १०० । AED 10 । US$ 2 www.panthastha.com




## 'अर्थ'हीन राज्य संकल्प

## भारतीय गुरुकुल परंपरा

## आदिवासी विकास

## मायानगरी दुबई

Panthastha Android App


MS DHONI
CRICKET ACADEMY
SPORTS
EDUCATION +
Now opportunity to learn the game from "DHONI"
ADMISSION
OPEN
NOW
INDIA'S FIRST
MS.DHONI'S
Residential Cricket Academy
+ RESIDENTIAL
NON-RESIDENTIAL
365 DAYS CRICKET (INDOOR NETS)
ACADEMIC FACILITY
HOSTEL FACILITY
RESIDENTIAL CRICKET PROGRAM
START YOUR SPORT CARRIER TODAY!
What if your child learns to PLAY and get EDUCATION together?
Associated Partners:
SGR sports academy
AARKA
International School
INDIA : 507/ Kanchanganga Estate Condominum, Narendra Nagar, Nagpur 440015.
UAE : 903/CBD 22, Sunstar 1, International City Dubai.
Call Now
+91 860 010 6939 | +971 585 31 0909

# अनुक्रमणिका


- संपादकीय .................................................. ४
- भारतीय गुरूकुल परंपरा .................................. ६
- ंपरिर्वनाचे पुस्तक विद्यापीठ ............................... ९
- वेब सिरीज .................................................. १०
- दुबई ........................................................ १२
- जंगोराईताड आदिवासी विकास संस्था ................. १४


विश्व पांथस्थ


**विश्व पांथस्थ**
वर्ष १, अंक ३
मे, २०१८

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
**संदीप वसंतराव कडवे**
कार्यकारी संपादक
**रवींद्र गुर्जर**

वितरण साहाय्य
**राजन तावडे**, अबू धाबी
**गजानन खोलगडे**, बहरीन
**धवल नांदेडकर**, फुजेरा
**वीरभद्र कारेगावकर**, अजमान
**किशोर मुंढे**, अजमान

मुखपृष्ठ आणि सजावट
**मंदार प्रिंटर्स, पुणे**

**मूल्य : ₹100 | AED 10 | US$ 2**

**Vishwa Panthastha**
Year 1, Issue 3
May, 2018

First Marathi Monthly For NRI Maharashtrians

Editor
**Sandeep Vasantrao Kadwe**
Managing Editor
**Ravindra Gurjar**
Distribution Support
**Rajan Tawde,** Abu Dhabi
**Gajanan Kholgade,** Bahrain
**Dhawal Nandedkar,** Fujerah
**Veerbhadra Karegaonkar,** Ajman
**Kishor Mundhe,** Ajman

Cover & Design
**Mandar Printers, Pune**

**Price : ₹. 100 | AED 10 | US$ 2**

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए-७०३, निसर्ग सिटी-२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे - ४११०५७ येथे प्रसिद्ध केले.
**संपादक - संदीप वसंतराव कडवे**
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

'Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe, and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
Mob. : +91 9860678844
e-mail : editor@panthastha.com
website : www.panthastha.com
**Editor - Sandeep Vasantrao Kadwe**
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)



**या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

संपादकीय



# 'अर्थ'हीन राज्य संकल्प

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली व आता महाराष्ट्र ५८ वर्षाचा झाला. १५ ऑगस्ट १९४७ ते १ मे १९६० पर्यंत बॉम्बे प्रेसिडेन्सी अस्तित्वात होती. १९५६ च्या राज्य पुनर्गठन कायद्यानुसार भाषिक तत्त्वावर मध्य प्रदेशातून दक्षिण विदर्भ, हैदराबाद स्टेट मधून मराठवाडा महाराष्ट्राला मिळाला. सौराष्ट्र, कच्छ गुजरातला मिळाले व याच दिवशी गुजरातची निर्मिती झाली. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था व समाजकारण नेहमीच प्रगतिशील राहिले आहे. सध्या समाजकारण ढवळून निघाले आहे. अर्थकारणाची स्थिती फार चांगली नाही. राज्याच्या २०१८-१९ च्या अर्थसंकल्पाकडे नजर टाकली तर या संकल्पाची अर्थहीनता व काही मुद्दे प्रकर्षाने जाणवतात.

महाराष्ट्राचा GDP २७.९६ लाख करोड रुपये (म्हणजे USD ४३० बिलिअन) आहे. युएई व थायलंड या देशांचा GDP USD ४०७ बिलिअन आहे. म्हणजे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा आकार काही देशांपेक्षा मोठा आहे, हे उल्लेखनीय आहे. अर्थात रोजगाराची समस्या फार मोठी आहे. सर्वात जास्त म्हणजे ५१% रोजगार अजूनही कृषी क्षेत्रात आहे. परंतु अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा वाटा फक्त ११.९% आहे व तो निरंतर कमी होत आहे. उद्योगाचा GDP मधील वाटा ३३.६% असला तरी केवळ ९% रोजगार उद्योगातून निर्माण होतो आहे. सेवाक्षेत्राने GDP मध्ये भरीव ४०% योगदान दिले आहे व रोजगार निर्मिती देखील ५४.५% इतकी उल्लेखनीय केली आहे.

काळजीचे कारण पुढे आहे. २०१८-१९ मध्ये राज्याचा महसूल २.८८ लाख करोड रुपये (USD ४४ बिलिअन) इतका अपेक्षित असताना ३.६७ लाख करोड रुपये (USD ५६ बिलिअन) इतका खर्चदेखील अपेक्षित आहे. म्हणजे १.२१ लाख करोड रुपये तुटीचा हा अर्थसंकल्प आहे. या महसुलातून ५७.५% इतकी मोठी रक्कम केवळ राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांच्या पगार, निवृत्तीवेतन व राज्याच्या कर्जाच्या व्याजावर खर्च होणार आहे. राज्यावरील कर्ज ४.६१ लाख करोड इतके वाढणार आहे. हे कर्ज भविष्यात फिटण्याची सुतराम शकयता नाही. महाराष्ट्रदिन साजरा करताना ऋण काढून सण साजरा करणे या म्हणीची आठवण येते.

महाराष्ट्र गीतात वर्णन केल्याप्रमाणे बहु असोत सुंदर संपन्न की महा असे वर्णन केलेला संपन्न महाराष्ट्र आज या विपन्न अवस्थेत कसा व का पोहचला? या अवस्थेतून बाहेर पडून पुन्हा संपन्नतेची वाटचाल करण्याची पथदर्शक योजना कुणीही मांडते आहे का? त्यावर सार्वजनिक चर्चा होते आहे का? अशी कुठलीही योजना मांडताना कुणीही दिसत नाही. या मार्गावर बरोबर घेऊन जाण्याची मानसिकताही कुठे दिसत नाही.

अनिवासी मराठी भारतीयांचे महाराष्ट्राच्या प्रगतीतील योगदान म्हणूनच ठळकपणे जाणवायला हवे. २०१६-१७ मध्ये अनिवासी भारतीयांनी भारतात USD ६२.७ बिलिअन (म्हणजे साधारण ४ लाख करोड रुपये) रेमिटन्स च्या रुपात आणले. अनिवासी मराठी भारतीयांचा वाटा यात ७% गृहीत धरला तरी ही रक्कम २८.५ हजार करोड रुपये इतकी प्रचंड होते, जी महाराष्ट्राच्या प्रस्तावित महसुलाच्या १०% इतकी आहे. मुख्य म्हणजे फक्त १,४०,००० अनिवासी मराठी भारतीयांनी ही रक्कम पाठवली असावी असा अंदाज आहे. म्हणजे एका अनिवास भारतीयाने २०१६-१७ मध्ये एक वर्षात सरासरी २० लाख रुपये महाराष्ट्रात पाठवले असा त्याचा अर्थ होतो. यातील बहुतांशी रक्कम ही consumption वर खर्च होते ज्याचा सरळ व प्रत्यक्ष फायदा गाव, तालुका, शहर व राज्य पातळीवरच्या अनेक उद्योगांना होतो. सर्वात मोठा फायदा घरबांधणी क्षेत्राला तर त्या खालोखाल ट्रेव्हल टूरीझम, मनोरंजन, मेडिकल व हेल्थकेअर, शिक्षण, रिटेल या क्षेत्रांना होतो. सामाजिक योजना व प्रकल्पांसाठी यातील फार थोडी रक्कम वळती होते आहे. याचे मुख्य कारण म्हणजे, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या

भरवश्याच्या संस्थांचा अभाव. रोख रकमेशिवाय अनिवासी भारतीयांचा अनेक योजनांमध्ये, (सरकारी किंवा गैरसरकारी) प्रत्यक्ष सहभाग देखील तितकाच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त महत्त्वाचा आहे, ज्यासाठी आजही फारसे प्रयत्न होताना दिसत नाही. सरकारी योजनांमध्ये अशा प्रत्यक्ष सहभागालायेथील नोकरशाहीचा विरोधच असण्याची शक्यता जास्त आहे.

विश्व पांथस्थ च्या निमित्ताने अशा एका जागतिक,तटस्थ व भरवश्याच्या मंचाची आपण निर्मिती केली आहे. त्याला सर्वांचाच खूप चांगला प्रतिसाद मिळतो आहे. पांथस्थ ही एक विचारसरणी आहे. विश्व पांथस्थ ही एक महाराष्ट्राबाहेरील परंतु महाराष्ट्राबद्दल आस्था, आपुलकी व निष्ठा बाळगणाऱ्या सर्व अनिवासी भारतीयांची चळवळ आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आपण पांथस्थ या मोबाईल app ची निर्मिती केली आहे व ते google play store येथून download करता येईल. पांथस्थ च्या वेबसाईट www.panthastha.com वरून देखील हे app download करता येईल. यातून जगातील मराठी माणसांसाठी कार्य करणाऱ्या अनेक संस्थांची व अनिवासी मराठी भारतीयांची माहिती एका मंचावर एकत्रित होणार आहे. महाराष्ट्रा-बाहेरील मध्य प्रदेश, गुजरात, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, केरळ, उत्तर प्रदेश, राजस्थान व इतर राज्ये तसेच भारताबाहेरील आखाती देश, युरोप, अमेरिका, चीन, जपान व इतर अतिपूर्व देश, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, आफ्रिका, रशिया या देशात वास्तव्य करीत असलेल्या अनिवासी महाराष्ट्रीयांच्या एकमेकांशी संवादाला त्यामुळे चालना मिळत आहे. महाराष्ट्राबाहेरील अनेक संस्था विश्व पांथस्थशी जोडल्या जात आहेत. यातूनच मग अनेक प्रकल्प, समाजोपयोगी योजना तयार होणार आहेत. अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न आहे व त्यासाठी सर्व अनिवासी मराठी भारतीयांना यात सहभागी होण्याची विनंती आहे. महाराष्ट्र दिनाच्या व पुढील प्रगतीसाठी आपल्या सर्वांना शुभेच्छा.

**डॉ. संदीप कडवे, संपादक**
**११ मे, २०१८**


# 'विश्व पांथस्थ'ची वेबसाईट आणि ॲप

'विश्व पांथस्थ' मासिक छापील व डिजिटल स्वरूपात जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचावे असे प्रयत्न आहेत. वाचकांचा या मासिकाला खूपच चांगला प्रतिसाद आहे. हा अंक यु ए ई व्यतिरिक्त ओमान, बहरीन, कतार, सौदी, कुवेत, सिंगापूर, यु के, कॅनडा, हॉलंड, अमेरिका, जपान, मलेशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, रशिया या देशांत; महाराष्ट्राबाहेर भारतात मध्य प्रदेश, गुजरात, गोवा, कर्नाटक, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, बंगाल, दिल्ली वगैरे राज्ये व महाराष्ट्रात देखील वितरित करण्याची योजना आहे. या सर्व ठिकाणी मराठी मंडळी मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित व स्थायिक झालेली आहेत. आजपर्यंत या सर्वांचा एकत्र असा 'डेटाबेस' तयार झाला नाही. तो तयार करण्यासाठी www.panthastha.com या वेबसाईटची व Panthastha या Android मोबाईल ॲपची निर्मिती करण्यात आली आहे. मोबाईल ॲप Google Play Store मधून download व install करता येईल. ॲपवर किंवा वेबसाईटवर रजिस्ट्रेशन केल्यानंतर पांथस्थ चे अंक व लेख , न्यूज लेटर, छोट्या जाहिराती, मोठ्या जाहिराती, पांथस्थ च्या मुलाखती अशी विविध प्रकारची माहिती मिळेल. प्रिंट, वेब व ॲप या सर्व ठिकाणी 'सीमलेस'रीत्या माहिती दिसेल. ॲप इंटरॲक्टिव आहे. तुम्ही तुमच्या ग्रुपचे मेंबर देखील स्वतः रजिस्टर करू शकता. अनेक ग्रुप इथे एकत्ररीत्या दिसू शकतात. तुम्हाला प्रतिसाद देता येईल. तेव्हा या वेबसाईट व ॲप वर आपण सर्वांनी रजिस्टर करावे.

देश विदेशातील पांथस्थांनी पुढे येऊन आपले विचार, अनुभव, समस्या व सूचना लेखाच्या स्वरुपात येथे मांडाव्यात. कविता, स्फुट, मुलाखती, पुस्तक परीक्षण, प्रवास वर्णन, यशस्वी NRI व्यक्तींची चरित्रे देखील जरूर पाठवावीत. विविध देशांतील मराठी मंडळांना जर विशेषांक प्रकाशित करायचा असेल तर आमच्याशी जरूर संपर्क करा. तुमचा ग्रुप सोशल मीडियावर कार्यरत असेल तर सर्वांनी या वेबसाईटवर रजिस्टर करा. पांथस्थ मोबाईल ॲप प्ले स्टोअर मधून डाऊनलोड करा. सगळे लेख, विविध जाहिराती, छोट्या जाहिराती पाठवा. लवकरच वधुवर सूचक विभाग देखील पांथस्थ मोबाईल ॲप वर चालू करण्याचा विचार आहे. या सर्वांचा सदस्यांनी लाभ घ्यावा.

एक जाहिरातदार म्हणून तुम्हालाही या सर्व लोकांपर्यंत पोहोचावे, असे निश्चित वाटत असेल. तेव्हा विश्व पांथस्थच्या माध्यमातून तुम्ही किफायतशीररीत्या या सर्व लोकांसमोर आपले उत्पादन, प्रकल्प किंवा सेवा (प्रॉडक्ट, प्रोजेक्ट किंवा सर्विस) व्यवसाय किंवा कंपनी याबद्दल माहिती पोहोचवू शकता. बांधकाम व्यावसायिक व गृह योजना, (Builders, रिअल इस्टेट), वैद्यकीय सेवा (Hospitals, मेडिकल व हेल्थ केअर), शैक्षणिक संस्था व सेवा (Education Institutes), पर्यटन (Travel व Tourism), रेस्टॉरंट, हॉटेल व Hospitality, सर्व उद्योग व उद्योजक, खासगी व सरकारी योजना, सामाजिक संस्था या सर्वांसाठी अनिवासी मराठी भारतीयांपर्यंत पोहोचण्याची विश्व पांथस्थ ही एक सुवर्णसंधी आहे . यापूर्वी कदाचित असा मंच उपलब्ध नसल्याने तुम्ही त्यांच्यापर्यंत पोहचला नसाल, पण आता ही संधी आहे. तेव्हा आपण सर्वांनी याचा लाभ घ्यावा, विश्व पांथस्थसाठी जाहिरात देऊन या उपक्रमाला प्रोत्साहन द्यावे आणि विश्व पांथस्थच्या सर्व उपक्रमांत आनंदाने सहभागी व्हावे ही नम्र विनंती

संपर्क : email id: editor@panthasha.com website: www.panthastha.com
Mobile App: Panthastha (Playstore) Mobile: +91 9860678844



# भारतीय गुरुकुल परंपरा

– रवींद्र गुर्जर

चित्र सौजन्य : 'कनकश्रृंगा' स्मरणिका, मध्यप्रदेश शासन, संस्कृति विभाग.

**विद्यमान गुरुकुले ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची केंद्रे आहेत. तिथे वेदयोगादि शिक्षणापासून, आज आवश्यक असलेल्या विज्ञान, शेती, कलाकौशल्याचा अभ्यासक्रम ठेवलेला असतो. प्राचीन आणि आधुनिक ज्ञानाचा समन्वय! सर्वसाधारण कालावधी बारा वर्षांपर्यंत असतो, आणि आध्यात्मिकतेचे धडे तिथे मिळतात. संस्कृत भाषेला प्राधान्य असून, स्थानिक मातृभाषा आणि हिंदी–इंग्रजीचा माध्यम म्हणून वापर होतो. त्यात दर ठिकाणी थोडाफार फरक असू शकतो. शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्याची जवळून ओळख होते. त्याच्या अधिक–उण्या क्षमतेनुसार मार्गदर्शन करता येते. विशेष आवडी चांगल्या जोपासल्या जातात. भावी उत्तम नागरीक म्हणून त्याची जडणघडण होते. पुस्तकी शिक्षणापेक्षा शरीर, मन आणि आत्मा यांची उन्नती होऊन, एक स्वयंपूर्ण, उच्च ध्येयाधिष्ठित व्यक्ती, गुरुकुल निर्माण करते.**

आपली गुरुकुल परंपरा फार प्राचीन आहे. त्रेतायुगात भगवान श्रीरामाने महर्षि वसिष्ठांकडे शिक्षण घेतले. कृष्ण–सुदामा सांदिपनी ऋषींच्या आश्रमात बालपणी शिकले. गुरुगृही राहून सर्व विद्यांचे शिक्षण घेण्याची पद्धत त्या काळी होती. सर्वांना तिथे मुक्त प्रवेश होता. ऐपतीप्रमाणे गुरुदक्षिणा दिली जात असे. आश्रमातील दैनंदिन कामे विद्यार्थी करत असत. हजारो वर्षे हा क्रम अव्याहतपणे चालू होता.

अलिकडेच मिळालेल्या एका आकडेवारीनुसार ब्रिटनमध्ये १९व्या शतकात पहिली अधिकृत शाळा उघडली; आणि त्यावेळी भारतात ७,३२,००० गुरुकुले होती. तसेच साक्षरता ९०%च्या वर होती. आकडे अतिशयोक्तीचे वाटत असले तरी ते अशक्य नाही. आजमितीला देशात सात लाख खेडी आहेत. एक लाखाच्या वर वस्ती असलेली शहरे सुमारे ४००० आहेत. मोठ्या शहरात जशा अनेक शाळा आणि महाविद्यालये असतात, त्याप्रमाणे जुन्या काळी लाखांच्या घरात लहान–मोठी गुरुकुले असणार. परिस्थितीनुसार शुल्क द्यायचे असल्यामुळे 'न परवडण्याचा प्रश्न'च नव्हता.

'गुरुकुल' या विषयावर विचार करण्याचे प्रयोजन असे की, नुकतेच म.प्र. मधील उज्जैनला 'आंतरराष्ट्रीय विराट गुरुकुल संमेलन २८, २९, ३० एप्रिलला मोठ्या दिमाखात पार पडले. केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. प्रकाश जावडेकर, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. शिवराजसिंह चौहान, अन्यमंत्री, डॉ. सत्यपाल सिंह, श्री. सुरेंद्र पटवा, तसेच स्वामी गोविंददेव गिरी, स्वामी राजकुमार दास आणि स्वामी संवित सोमगिरी यांची सन्माननीय उपस्थिती होती. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत प्रमुख वक्ते होते. गुरुकुल पद्धती आणि त्याचे कार्य दाखविणारे मोठे प्रदर्शन भरवण्यात आले होते. देशातील विभिन्न राज्यांमधून आलेल्या साधुसंतांनी श्रौत यज्ञ संपन्न केला आणि सारे वातावरण वेदमंत्रांनी दुमदुमले. या निमित्ताने 'कनकश्रृंगा' या नावाने एक अत्यंत देखणी व माहितीपूर्ण स्मरणिका प्रकाशित करण्यात आली. संशोधकांना 'गुरुकुल' या विषयावर तपशीलवार विस्तृत माहिती त्यात मिळेल. संग्राह्य आणि अभ्यसनीय ठेवा!

विद्यमान गुरुकुले ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची केंद्रे आहेत. तिथे वेदयोगादि शिक्षणापासून, आज आवश्यक असलेल्या विज्ञान, शेती, कलाकौशल्याचा अभ्यासक्रम ठेवलेला असतो. प्राचीन आणि आधुनिक ज्ञानाचा समन्वय! सर्वसाधारण कालावधी बारा वर्षांपर्यंत असतो, आणि आध्यात्मिकतेचे धडे तिथे मिळतात. संस्कृत भाषेला प्राधान्य असून, स्थानिक मातृभाषा आणि हिंदी–इंग्रजीचा माध्यम म्हणून वापर होतो. त्यात दर ठिकाणी थोडाफार फरक असू शकतो. शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्याची जवळून ओळख होते. त्याच्या अधिक–उण्या क्षमतेनुसार मार्गदर्शन करता येते. विशेष आवडी चांगल्या जोपासल्या जातात. भावी उत्तम नागरीक म्हणून त्याची जडणघडण होते. पुस्तकी शिक्षणापेक्षा शरीर, मन आणि आत्मा यांची उन्नती होऊन, एक स्वयंपूर्ण, उच्च ध्येयाधिष्ठित व्यक्ती, गुरुकुल निर्माण करते. जात–जमात, धर्म, भाषा, भूगोल यांच्या पलिकडे जाऊन, शिकण्याची इच्छा असलेल्या प्रत्येकाला तिथे प्रवेश मिळतो. उच्च शिक्षणाची व्यवस्थाही तिथे होते. आवश्यकतेनुसार जवळच्या विद्यापीठांमधून परीक्षा देण्याचा पर्यांय उपलब्ध असतो. बहुतेक ठिकाणी नि:शुल्क (भोजन–निवासासहित) प्रवेश असतो. संपूर्ण जगात फक्त फिनलँडमधील शिक्षणपद्धती आपल्या गुरुकुल परंपरेशी मिळतीजुळती आहे.

इ.स.पू. ३०० मध्ये ग्रीक राजदूत मेगॅस्थेनीसने असे लिहून ठेवले आहे

की, 'कोणीही भारतीय असत्य बोलण्याचा अपराध करत नाही. सत्य भाषण आणि सदाचार या त्याच्या दृष्टीने अत्यंत मूल्यवान गोष्टी आहेत'. अशा प्रकारे भारताने केवळ ज्ञान-विज्ञानच नाही, तर नीतिमत्ता, प्रामाणिकपणा आणि सदाचाराच्या दृष्टीनेही नेत्रदीपक, विकास केला होता. वसिष्ठ, विश्वामित्र आणि सांदिपनींसारख्या ऋषींचे आश्रम प्राचीन काळी प्रसिद्ध होते. तसेच, नालंदा, तक्षशिला, वल्लभी, विक्रमशिला, मिथिला, काशी, उज्जैन आणि काश्मीरमधील विश्वविद्यालये ही 'गुरुकुले'च होती. राजे-महाराजे आणि धनिक लोक त्यांना पुरेसा वित्तपुरवठा करत असते. अध्ययनासाठी भारताबरोबरच चीन, जपान, तिबेट, श्रीलंका, कोरिया या देशांमधूनही छात्र तिथे येत असत. फाहियान, ह्यएनत्संग यांची नावे आपल्याला माहित आहेत. शिस्त, स्वावलंबन आणि व्यायाम 'गुरुकुला'त अनिवार्य असते.

उज्जैनच्या संमेलनात शिक्षणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी शिक्षणाच्या प्राचीन गौरवशाली परंपरेचा उल्लेख करून, सरकार सध्याच्या महाविद्यालयीन शिक्षणात आवश्यक ती सुधारणा करून 'गुरुकुल' पद्धतीचा कसा अंगिकार करता येईल, हे पाहील असे आश्वासन दिले. त्यासाठी त्यांनी प्रस्तावही मागितले आहेत. मूल्याधारित शिक्षण अनिवार्य झाले पाहिजे. गुण-कौशल्य विकासाबरोबर, उद्योग-व्यवसायांचे ज्ञानही प्राप्त केले की आत्मनिर्भरता येणारच. नोकरीच्या मागे न लागता, स्वत: उद्योजक बनून अनेक जणांना चरितार्थाचे साधन मिळवून देण्याचे उद्दिष्ट तिथल्या छात्राने ठेवले पाहिजे.

संमेलनाच्या उद्घाटन समारंभात स्वामी गोविंददेव गिरी म्हणाले, ''हा एका ऐतिहासिक कार्याचा शुभारंभ आहे. भारतात शिक्षणासाठी दुसऱ्या स्वातंत्र्याची आवश्यकता आहे. साऱ्या जगात भारतानेच ज्ञानाचा प्रकाश पसरवला होता. मात्र अठराव्या शतकात ब्रिटिशांनी सारी शिक्षण प्रणालीच बदलून टाकली. देशाच्या स्थितीनुसार त्याचा विकास झाला पाहिजे. आपल्याला नोकर्‍या मिळण्यासाठी पदव्या नको आहेत. परिपूर्ण जीवनविद्या आणि सक्षम जीवन-चरितार्थ 'गुरुकुला'तूनच साध्य होतो. ही व्यवस्था स्वायत्त हवी. सरकारने त्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करावे, त्यातील अडचणी दूर कराव्यात.

आपल्याकडे शैक्षणिक धोरण ठरविण्यासाठी समित्या स्थापन झाल्या, त्यांचे अहवाल आले, पण अन्य अहवालांसारखे ते धुळीत जाऊन पडले. विनोबांच्या 'शिक्षण विचार' या पुस्तकाची इथे आठवण येते. 'कॉलेज' शब्दाची व्याख्या त्यांनी अशी केली होती. 'काल: इज्यते यत्र!'- 'जिथे काळ व्यर्थ वाया घालवला जातो'. शाळा महाविद्यालयातील औपचारिक शिक्षण आवश्यक आहे; परंतु त्याचबरोबर बाहेरच्या जगाचे ज्ञान आणि शेतीसह उद्योग-व्यवसायांचे प्रशिक्षणही मिळाले पाहिजे. डॉक्टर झाल्यावर जशी एक वर्ष 'इंटर्नशिप' करावी लागते. तसे दरवर्षी विद्यार्थ्यांनी काही महिने बाहेर काम केले पाहिजे. पावसाळ्यात शेतकर्‍यांबरोबर काम करावे. लष्करी आणि नागरी संरक्षणाचे प्रशिक्षण घ्यावे. देशी आणि परदेशी भाषा शिकाव्यात. प्रवास करावा. दरवर्षीचा अभ्यसाक्रम आणि त्यानंतर परीक्षा, यात (एक महिना सोडून) संपूर्ण वर्ष जाते. तोच अभ्यास ७-८ महिन्यांत पूर्ण करणे शक्य आहे. राहिलेल्या काळात वर उल्लेख केल्याप्रमाणे अन्य शिक्षण घ्यावे. सर्व देशभर शिक्षणाचा आकृतिबंध एकच असावा.

विनोबांनी बरेच काही सांगितले आहे. ते अंमलात आणण्याची मानसिकता आणि धाडस कुठल्याही सरकारमध्ये दिसलेले नाही. 'गुरुकुल' परंपरेच्या प्रसार व पुनरुत्थानाने प्राचीन काळासारखा एक आदर्श देश उभा राहील, असा सार्थ विश्वास वाटतो.

# वैश्विक नागरिक - प्रवासी भारतीय

पांथस्थ को हम सब लोग अक्सर प्रवासी भारतीय के नाम से जानते है । प्रवासी भारतीय वे लोग हैं जो भारत छोड़कर विश्व के दूसरे देशों में जा बसे हैं। ये दुनिया के अनेक देशों में फैले हुए हैं। ४८ देशों में रह रहे प्रवासियों की जनसंख्या करीब २ करोड़ है। इनमें से ११ देशों में ५ लाख से ज्यादा प्रवासी भारतीय वहां की औसत जनसंख्या का प्रतिनिधित्व करते हैं और वहां की आर्थिक व राजनीतिक दशा व दिशा को तय करने में महत्त्वपूर्ण भूमिका निभाते है । यहां उनकी आर्थिक, शैक्षणिक व व्यावसायिक दक्षता का आधार काफी मजबूत है। वे विभिन्न देशों में रहते हैं, अलग भाषा बोलते हैं परंतु वहां के विभिन्न क्रियाकलापों में अपनी भूमिका निभाते हैं। प्रवासी भारतीयों को अपनी सांस्कृतिक विरासत को अक्षुण्ण बनाए रखने के कारण ही साझा पहचान मिली है और यही कारण है जो उन्हें भारत से गहरे जोड़ता है।

देखा जाए तो हिन्दुस्तानियों की तादाद लगभग हर देश में है । कनाडा में दस लाख, अमेरिका में साढे बाईस लाख, त्रिनिदाद में साढे पांच लाख, गियाना में तीन लाख बीस हजार, सुरीनाम में एक लाख चालीस हजार, ब्रिटेन में १५ लाख, फ्रान्स में दो लाख अस्सी हजार, साउदी अरब मे १८ लाख, बेहरीन मे साढे तीन लाख, कुवैत में पांच लाख अस्सी हजार, कतार में पांच लाख, युनाईटेड अरब अमीरात में १७ लाख, दक्षिण आफ्रिका में १२ लाख, मॉरिशस में नौ लाख, यमन में एक लाख २० हजार, ओमान में पांच लाख साठ हजार, श्रीलंका में १६ लाख, नेपाल में ६ लाख, मलेशिया में २१ लाख, म्यानमार में साढे तीन लाख, सिंगापूर में ६ लाख, फिजी में ३ लाख २२ हजार और ऑस्ट्रेलिया में साढे चार लाख भारतवंशी निवास कर रहे है ।

दुनिया भर के देशों में सरकार में सर्वोच्च या प्रमुख पद वालों मे भारतवंशी आगे ही है । फिजी में एक, गियाना में १४, मलावी में १, मलेशिया में ४, मॉरिशस में १७, मोजाम्बिक में १, सिंगापूर में ८, श्रीलंका में २, दक्षिण आफ्रिका में ४ लोगों ने सरकार में सर्वोच्च या प्रमुख पद पाया है ।

इसी तरह कनाडा में ९, जिम्बाब्वे में १, ब्रिटेन मे २४, त्रिनिदाद और टुबैगो में २३, युगांडा में १ तंजानिया में ४, इंडोनेशिया में १, आयरलेंड में १, मलेशिया में दस, सूरीनाम में १८, श्रीलंका में २, दक्षिण अफ्रीका में १६, सिंगापूर में ४, पनामा में एक, मोजाम्बिक में ११ और मॉरिशस में ३६ भारतीय मूल के संसद सदस्य या सिनेटर रह हैं ।

जहां-जहां प्रवासी भारतीय बसे वहां उन्होंने आर्थिक तंत्र को मजबूती प्रदान की और बहुत कम समय में अपना स्थान बना लिया। वे मजदूर, व्यापारी, शिक्षक अनुसंधानकर्ता, खोजकर्ता, डाक्टर, वकील, इंजीनियर, प्रबंधक, प्रशासक आदि के रूप में दुनियाभर में स्वीकार किए गए। प्रवासियों की सफलता का श्रेय उनकी परंपरागत सोच, सांस्कृतिक मूल्यों और शैक्षणिक योग्यता को दिया जा सकता है। कई देशों में वहां के मूल निवासियों की अपेक्षा भारतवंशियों की प्रति व्यक्ति आय ज्यादा है। वैश्विक स्तर पर सूचना-तकनीक के क्षेत्र में क्रांति में इनकी महत्त्वपूर्ण भूमिका रही है, जिसके कारण भारत की विदेशों में छवि निखरी है। प्रवासी भारतीयों की सफलता के कारण ही आज भारत आर्थिक विश्व में आर्थिक महाशक्ति के रूप में उभर रहा है।

(Source: Wikipedia and Internet)

# मराठी साहित्यिक आणि संशोधकांचे आश्रयस्थान..

# ग्रंथसखा वाचनालय

तेलवणे टॉवर्स, बदलापूर (पूर्व), जि. ठाणे.
मो.: ९३२००३४१५६




## आगामी संकल्प

- मराठी भाषेच्या संवर्धन-संशोधनासाठी स्वायत्त मराठी विद्यापीठाची स्थापना.
- ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे साहित्य-संस्कृती विषयक उपक्रमांसाठी सांस्कृतिक भवन उभारणे.
- ललित लेखकांसाठी कार्यशाळा. साहित्याचा आस्वाद कसा घ्यावा, हे शिकविणारे शिबिर.
- साहित्य जगतात घडणाऱ्या अनेक गोष्टींचे डॉक्युमेंटेशन.
- ख्रिस्ती मराठी साहित्य, जैन व बौद्ध वाङ्मयाच्या अभ्यासासाठी दालने.
- सेट व नेट परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.



# परिवर्तनाचे पुस्तक-विद्यापीठ

– श्यामसुंदर जोशी

**''भिलार'' या पुस्तकांच्या गावाची निर्मिती करताना श्री. श्याम जोशी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या प्रकल्पाला नुकतेच एक वर्ष पुर्ण झाले. त्या निमित्ताने श्यामरावांनी व्यक्त केलेले विचार...**

गेली १०० वर्षे तरी महाराष्ट्रात प्रबोधनाचे युग सुरू आहे. समाज परिवर्तन आणि लोकशाहीचे चारही खांब मजबुतीने उभे करणे, हे संसदीय लोकशाहीचे प्रमुख उद्दिष्ट! बर्ट्रॉन्ड रसेल या विचारवंताने जाहीरपणे सांगितले आहे की शिक्षणाचा हेतू लोकशाही राष्ट्राला अपेक्षित असणारा नागरीक बनवणे. यासाठी परिवर्तनाचा ज्ञानयज्ञ सातत्याने प्रज्वलीत ठेवण्याची गरज आहे.

परिवर्तनाचे सर्वात प्रभावी हत्यार चर्चा, संवाद, रचनात्मक काम. त्यासाठी विचार लागतात... आणि, विचारमंथनासाठी तळागाळातल्या लोकांपासून सर्वांच्या हातात ग्रंथ व मस्तकात ग्रंथसत्ता असणे महत्त्वाचे. नव्या पद्धतीने कालसुसंगत विचार करणारे मन निर्माण झाल्याशिवाय आदर्श राष्ट्र निर्माण होणे कठीणच; हे एकदा मान्य केल्यावर परिवर्तनाच्या चळवळीला काही महत्त्वाचे कार्यक्रम हाती घ्यावे लागतात. त्या कार्यक्रमाचाच महत्त्वाचा एक भाग म्हणजे भिलार येथील महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने सुरू झालेला पुस्तकांच्या गावाचा प्रकल्प!

आजपर्यंत तरी जगभरातील कुठल्याही शासकीय व्यवस्थेने अशा प्रकारचा पुस्तकांच्या गावाचा संकल्प सोडलेला दिसत नाही; पण दोन वर्षांपूर्वी पुस्तकांच्या गावाचा हा संकल्प महाराष्ट्र सरकारचे माननीय मराठी भाषामंत्री श्री. विनोद तावडे यांनी केला आणि दि. ४ मे २०१७ रोजी प्रकल्प मार्गी लागल्याचे समाधान अनेक ग्रंथप्रेमींना लाभले. बघता बघता एक वर्ष उलटले आहे. गेल्या वर्षभरात सुमारे ५० हजारपेक्षा जास्त ग्रंथप्रेमींनी भिलारच्या या प्रकल्पाला भेट दिली आहे. यातच अशा प्रकारच्या उपक्रमाची यशस्विता सिद्ध झाली आहे.

पाचगणीच्या पुढचे भिलार हे एक छोटेसे गाव! एखाद्या आर्टपेपरवर छापलेल्या निसर्गचित्रातल्या गर्द झाडीतून डोकविणाऱ्या गावासारखे दिसणारे... रंगीबेरंगी छते असलेली आतिथ्यशील घरं, परसातच स्ट्रॉबेरीची शेती. समृद्ध गाव. कोणतीही वखवख नाही. तृप्त, नव्याचं स्वागत करायला उत्सुक असलेली ग्रामस्थ मंडळी. इतिहासामध्ये रामस्पर्शाने जशी अहिल्या जिवंत झाली... अगदी तसंच श्री. विनोद तावडे यांच्या विचारस्पर्शाने भिलारकर थरारून उठले. समृद्धी तर होतीच पण त्याबरोबर जगण्याचे प्रयोजन सापडले. सर्व लहानथोर ग्रामस्थ जात, पंथ, धर्म, राजकीय पक्ष भेदाभेद विसरून कामाला भिडले. ज्या घरात पुस्तकं कशाशी खातात हे माहीत नव्हतं, त्या घरात पुस्तकाच्या शोधात अतिथी यायला लागले. त्यांच्याशी होणाऱ्या चर्चा... संवादात पुस्तकातले विचार जिवंत झाले... अनेक गोष्टी नव्याने समोर आल्या. अवघं जिणंच समृद्ध होत गेलं... आणि बघता बघता पुस्तकाच्या गावाच्या या संकल्पामुळे, माझ्या भाषेत Creative Madness मुळे, भिलार हे गाव जगाच्या नकाशावर गेलं... नुसता राजा कुस्तीप्रेमी असून चालत नाही. लोकांनाही आखाड्यातल्या मातीची ओढ असावी लागते, तरच ती परंपरा समृद्ध होते. त्याप्रमाणेच ग्रंथप्रेम हे भिलारकरांच्या डीएनए चा भाग बनला आणि त्यामुळेच या पुस्तकाच्या गावाचे भविष्य निःसंशय उज्ज्वल आहे. विनोद तावड्यांच्या ग्रंथगावची कल्पना छान आकाराला येत आहे, नवे आयाम जोडले जात आहेत.

कार्लाईल हा प्रसिद्ध विचारवंत म्हणतो की शालेय–माहविद्यालयीन शिक्षणापेक्षा आपलं खरं शिक्षण सुरू होतं ते ग्रंथांच्या सहवासात. समृद्ध ग्रंथदालनं ही खरी मुक्त विद्यापीठं आणि असे मुक्त ग्रंथ–विद्यापीठ भिलार या गावी सुरू झालं आहे. या! अवघे या! सारे या! पुस्तकातली मजा बघा! हजारो वर्षांचे माणसांचे अनुभव तुम्हाला थक्क करून सोडतील. वाचनाची सवय लावून घ्या. यापूर्वीचा अंधार दूर सारा. प्रकाशाची दारे उघडतील. पुस्तकांमध्ये ज्ञानाची कोठारं आहेत, ती बंदिस्त आहेत. तुम्ही जेव्हा एखादे पुस्तक उघडून वाचता, त्यावेळी खरा पुस्तकाचा जन्म होतो, आणि त्यातील विचार तुम्ही जेव्हा आत्मसात करता, त्यावेळी एका नव्या संस्कृतीचा जन्म होतो. ग्रंथांमुळे मोठ्या झालेल्या व्यक्तींच्या विकासाच्या पाऊलखुणा पुस्तकांच्या गावात गेल्यावर तुम्ही पाहू शकाल. त्या पायवाटेवरून चालतानाचा थरार येथे अनुभवता येतो.

स्वतंत्र विचार करण्याची लोकांची सवय वाढवण्यासाठी पुस्तकाच्या गावासारखे प्रकल्पच उपयुक्त ठरतात. आदर्श राष्ट्र निर्माण करण्याचा मूलमंत्र म्हणजे असे प्रकल्प होत. विचारशील अशा नव्यायुगाच्या निर्मितीची बीजं या प्रकल्पात मला जाणवतात.

राजकीय द्रष्टेपण ही लोकशाही टिकवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची गोष्ट. मोठमोठी स्वप्नं पाहणं ही तशी फार सोपी गोष्ट आहे. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी जी गुणसंपदा कार्यकर्त्यांमध्ये लागते त्याचं दृश्यस्वरूप म्हणजे हे भिलारचे पुस्तकांचे गाव!




## चित्रपट आणि मालिकांचे महाजाल

# वेब सिरीज



पियू गडकरी वालवडकर

एका प्रसिद्ध सिनेमातला सुप्रसिद्ध संवाद : ''फिल्में सिर्फ तीन चीजोंकी वजहसे चलती है, एंटरटेन्मेंट, एंटरटेन्मेंट, एन्टरटेन्मेंट !'' आपल्या रोजच्या जीवनातला कंटाळा ' तीन चीजोंकी वजहसे दूर होता है, एंटरटेन्मेंट, एंटरटेन्मेंट, एन्टरटेन्मेंट !' मनोरंजन हा आपल्या जीवनातला एक अविभाज्य घटक आहे. अगदी पुरातन काळापासून मनोरंजनाचे अनेक प्रकार आपणांस पहावयास मिळाले आहेत. राजदरबारात अनेक नर्तिका असायच्या, शिवाय गायक होते, नाटक करणारे अनेक कलावंत होते, कवि होते. मग नाटक आले, संगीत कला रुजू लागली. वग, तमाशा, बोलपट, थोडक्यात काय तर मनोजरंजन होतेच, आणि मग काळ झपाट्याने पुढे सरकत गेला आणि जमाना आला टी.व्ही. चा आणि टी.व्ही. ला मनोभावे साथ दिली ती 'दूरदर्शन' ने.

दूरदर्शनइतकी प्रिय गोष्ट त्यावेळी कोणतीच नव्हती, पंधरा-वीस मिनिटांच्या विनोदी मालिकासुद्धा महत्त्वाचे साधन होत्या आणि त्यातूनच सुरू झाला मनोरंजनाचा अखंड प्रवास, न संपण्यासाठीचा. चित्रपट क्वचितच पहायला मिळायचे. त्याला पर्याय होता तो विडीयो लायब्ररीचा. नाटक जोडीला होतेच, काळ झपाट्याने पुढे जात गेला आणि त्याबरोबर तंत्रज्ञानही. वेगवेगळ्या जाहिराती, ज्यांनी मनात घर करायला सुरुवात केली, कार्टून्स्, टेलिफिल्मस् आणि त्यानंतर केबल टी.व्ही.च्या साथीने सगळ्यांना झपाटलेच. अनेक वाहिन्या आणि त्या वाहिन्यांवरील साधेपणातून सुरू होऊन भपकेबाजपणात सामावून जावुन रसिकांच्या मनात अधिराज्य गाजवणाऱ्या मालिकांनी संपूर्ण जगात धुमाकूळ घातला, आणि एक वेगळाच जमाना उदयास आला.

तंत्रज्ञान विविध पद्धतीने विकसित होत होतं, आणि ते आणखी प्रगत होण्यासाठी गरज होती ती जास्त जवळ येण्याची, याला एक पर्याय उपलब्ध होता तो म्हणजे 'इंटरनेट' - जो पर्याय 'सुपरहिट' ठरला, आणि जग भविष्याची गोड स्वप्ने रंगवू लागलं. मग कम्प्युटर आले, मोबाईल फोन आले, मोबाईल फोनच जरा स्मार्ट झाले, आणि ते सगळ्यांचे काम करू लागले. मनोरंजन चक्र आपल्या हातात आले, आणि मनारंजनाच्या मोठ्या विश्वात जन्म घेतला 'वेबसिरीज' नावाच्या नवीन गोष्टीने. वेबसिरीज म्हणजे 'टेलिव्हिजन' च्या माध्यमाद्वारे लिखित किंवा अलिखित व्हीडिओज जे वेगवेगळ्या भागांद्वारे (एपिसोड्कि फॉर्म) इंटरनेट वर प्रसारित केले जातात, त्यांना 'एपिसोड' किंवा 'वेबिसोड' असे संबोधले जाते. डेस्कटॉप, लॅपटॉप, टॅब्लेट्स्, स्मार्टफोन किंवा अगदी टीव्ही वर सुद्धा आपण ते पाहू शकतो. अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे 'रीड हस्टिंग्स' आणि 'मार्क रेडोल' यांनी २९ ऑगस्ट १९९७ रोजी मनोरंजनाचा खजिना शोधला, म्हणजे एक मनोरंजन करणारी कंपनी 'नेटफ्लिक्स'. २०१३ मध्ये आपल्या व्यवसायाचा विस्तार फिल्म आणि टेलिव्हिजन मध्ये त्याचबरोबर ऑनलाईन वितरणामध्ये सुद्धा केला. २०१७ च्या सर्वेच्या अनुसार पाच हजार चारशे कर्मचारी नेटफ्लिक्स साठी काम करतात. अलेक्स रँकच्या २०१८ च्या सर्वनुसार (अलेक्साका इंटरनेट, इंक कॅलिफोर्निया मध्ये आधारित अमेरिकन कंपनी आहे जी व्यावसायिक वेब ट्रॅफिक डेटा आणि विश्लेषणे प्रदान करते) नेटफ्लिक्सचा २९ वा क्रमांक लागतो. नेटफ्लिक्सने २०१२ मध्ये कंटेन्ट (सामग्री) उत्पादन उद्योगामध्ये प्रवेश केला. आपली पहिली सिरीज Debining, Lillyhammer काढली. या नंतर सिनेमा आणि टी.व्ही. सिरीज दोन्हींच्या उत्पादन उद्योगामध्ये फार विस्तार केला आहे. नेटफ्लिक्सने २०१६ मध्ये १२६ फिल्मस् सिरीज रिलीज केल्या आहेत, ज्या कोणत्याही इतर नेटवर्क किंवा केबल चॅनलच्या तुलनेत अधिक आहेत.

२००३ मध्ये मायक्रोसॉफ्ट ने एम.एस.एन. विडीयो प्रक्षेपित केला, विएर्ड टी.व्ही. ने त्यासाठी जवळ डझनभर विनोदी स्केचेस आणि छोट्या छोट्या डॉक्युमेंट्रीज् २००३ ते २००६ या काळात तयार केल्या. २००८ साली ब्राओने त्याची पहिली साप्ताहिक वेबसिरीज ''द मलान शो'' प्रक्षेपित केली. न्यूयॉर्क शहरातील फॅशन डिझायनर मलान ब्रेटोन जो एक स्वतंत्र आणि यशस्वी डिझायनर होण्यासाठी कायम प्रयत्नशील असतो, त्याच्या जीवनावर आणि प्रयत्नांवर आधारित ही वेबसिरीज खूप काही देऊन जाते.

त्याचप्रमाणे 'Pitchers' द व्हायरल वेबसिरीज पिक्चर्स ज्याला २०१५ मध्ये प्रदर्शित केले गेले होते. त्यामागची कथा म्हणजे चार तरूण व्यावसायिकांचे जीवन, जे एका राकट किंवा जंगली वाईट उद्यमशीलतेच्या दुनियेतून बाहेर येण्यासाठी आपली नोकरी सोडतात. या सिरीजचा प्रत्येक भाग हा ४० मिनिटांचा आहे. त्याचप्रमाणे 'परमनंट रूममेटस्' तीन वर्षे 'लाँगडिस्टन्स रिलेशनशिप' मध्ये राहणाऱ्या दांपत्याची कथा, जे शेवटी लग्नाचा विचार मनात घेऊन एकमेकांना भेटतात. ही भावनिक अशी कथा आहे. सध्या फेमस असणारी 'नार्कोज' ही एक अमेरिकन गुन्हेगारीवर आधारित वेबसिरीज आहे, जी क्रिस ब्रंकतो, कर्लो बर्नाट आणि डग मिरो यांनी निर्माण केली आहे. याचे चित्रीकरण कोलंबिया मध्ये केलं गेलेलं आहे, ती एका अशा व्यक्तीवर आधारित आहे जी कोकेन उत्पादन आणि वितरणाच्या माध्यमातून अरबपती झालेला आहे. सीझन १ मध्ये १० भाग आहेत, जे तरूणाईला वेड लावतात. असे एकूण ३ सीझन आहेत.

प्रगत झालेल्या देशांनी आपापले तंत्रज्ञान विकसित करून नवनवीन प्रयोग केले, तर प्रगतीपथाच्या मार्गावर भारताची तरूण पिढी सुद्धा कशी शांत बसेल! AIB (ऑल इंडिया बकचोद) हा इंडियन कॉमेड स्केच ग्रुप जो गुरूसिरन खांबा, तन्मय भट, रोहन जोशी आणि अमित शक्य यांनी निर्माण करून, युट्युब चॅलन साठी राजकारण, समाज आणि हिन्दी इंडस्ट्री साठी विनोद स्केचेस केले. त्याचप्रमाणे बॉयगिरी ही एकता कपूरची सहा मुलांच्या धाडसी आणि थोड्या मजेशीर जीवनावर आधारित असलेली वेबसिरीज १५ ते २७ मिनिटांच्या कालखंडात खूप काही देऊन जाते. 'गन्स अॅन्ड थाईज' ही राम गोपाल वर्मा लिखित आणि दिग्दर्शित वेबसिरीज १९९० सालच्या अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम आणि छोटा राजन यांच्या वास्तव जीवनावर आधारित आहे. ही वेबसिरीज म्हणजे बिनधास्तपणे वापरलेली 'नग्नता' आणि उद्धट किंवा थोडीशी राकट भाषा वापरून पहिली हिन्दी वेबसिरीज देखील बनली. अर्थातच सेन्सॉरची कात्री न लागल्यामुळे त्याचे १० भागांचे चार सीझन्स झाले. त्याच प्रमाणे ALT, BALAJI, Backed, Bose : Dead / Alive, Breath, Girl in the City, Srushti, Life Sahi Hai, Made in India, Kadapa, Dev DD, Class of 2017, Voot, Haq se या आणि अशा प्रकारच्या अनेक वेबसिरीज गाजल्या.

हिन्दी – इंग्लिशचे वारे वाहत असतानाच मराठीने या क्षेत्रात ठसा उमटविण्यास सुरुवात केली, 'द डायरी ऑफ सायको' अशा प्रकारची फूटेज बेस्ड स्टोरी आपण हॉलिवूडच्या पॅरानॉर्मल अॅक्टिविटीज मध्ये पाहू शकतो किंवा हिन्दीमध्ये रागिनी एम.एम.एस. मध्ये. हा मराठीतील पहिला फूटेज प्रयत्न ठरेल. असा प्रयत्न मराठीत या आधी कधीच झाला नव्हता. ''आवाज कुणाचा'' हा 'वायरस मराठी' यांचा एक अद्वितीय प्रयत्न आहे, यांच्या कोणत्याच एपिसोड मध्ये संवाद नाहीत, पण पार्श्वसंगीत आणि कलाकारांच्या अभिनयाद्वारे त्यांनी खूपच चांगला संदेश पोहचवला आहे. 'Cooking : Trendy, Testy, Treats' by Bhargavi Chirnule छान, चविष्ट जेवण कोणाला आवडणार नाही? पण सध्या स्वयंपाकाभोवती सुद्धा छोटे छोटे असे अनेक प्रश्न दडलेले असतात, ज्याचे उत्तर 'भार्गवी चिरमुले' यांच्या या ब्रँड न्यू वेबसिरीज मधून दिले जाते. त्याच प्रमाणे फ्लिमश्टार, बॅकबेंचर्स, 'AWESOME TWOSOME' 'कास्टिंग काउच' अमेय वाघ आणि निपुण धर्माधिकारी यांची तुफानी आणि ऑल टाइम फेवरेट वेबसिरीज, 'घरोघरी अंबारी' ही विनोदी आणि छोटीशी अशी मनाला भावणारी वेबसिरीज आहे.

वेबसिरीजची दुनिया ही लाइक आणि सबस्क्राईब शिवाय अधुरी आहे. सेन्सॉरचं लक्षही आता हळूहळू यांच्याकडे वळतंय. यू ट्युबचे नियमही थोडे कडक होत चालले आहेत, एक विडीओ अपलोड केल्यावर त्याला किमान दहा हजार लाईक्स, आणि दहा हजार व्ह्यूज् मिळाले, तर तुम्ही १ अमेरिकन डॉलरसाठी पात्र होता, पंचेचाळीस मिनिटांच्या भागासाठी खूप कसरत करावी लागते, त्यात सेन्सॉर, स्वतःचं संगीत, आणि ती थोडीशी पॉप्युलर होऊन तिला लाईक्स मिळण्यासाठी जाहिरातबाजीसुद्धा तेवढीच करावी लागते. प्रसिद्धी आणि पैसा मिविण्यासाठी, तेवढीच मेहनत आणि थोडीशी 'स्क्रिप्टेड स्टंटबाजी' सुद्धा करावीच लागते. अर्थात सेन्सॉरने अजून पाहिजे तेवढं लक्ष न घातल्यामुळे, नेटकऱ्यांची बरीचशी सोय होऊन जाते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. वेब सिरीज हा एक पर्याय आहे. रटाळ, घर–घर सुरू असणाऱ्या कहाणीला, प्रेमात पडून पडून प्रेमाबद्दल तिटकारा वाटणाऱ्याला, तेच तेच बघून बघून, टी.व्ही. कडे पाठ फिरवू पहाणाऱ्याला; कधी वास्तव, कधी विनोदी, कधी भयानक, कधी थोडंसं आंबटगोड, असं वेबसिरीजचं विश्व हळूहळू सगळ्यांनाच जवळचं वाटू लागलं. उद्या याचा तोटा टेलिव्हिजन झाला तर नवल वाटणार नाही, कारण मोबाईल, टॅब्लेटच्या या जमान्यात काहीतरी नवनवीनच शोधलं जातं आणि त्यातूनच निर्माण होतं काहीतरी नवीन. तरूण पिढी जास्त फॉरवर्ड होऊ पाहते, आणि वयाने वाढलेली पण मनाने यंग असलेली पिढी त्यांना फॉलो करतेय. त्यामुळे अशा गोष्टींना मरण नाहीच. शेवटी महत्त्वाचं काय?

**।। एन्टरटेन्मेंट, एन्टरटेन्मेंट, एन्टरटेन्मेंट।।**

## 'विश्व पांथस्थ' विषयी वाचकांच्या प्रतिक्रिया

- अंक उत्तम झाला आहे. परदेशी वाचकांना नक्की आवडेल. साहित्य संस्थांना सहभागी करून घ्यावे. माझ्या हार्दिक शुभेच्छा

**– प्रा. मिलिंद जोशी**
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

- आर्टपेपरवर चाररंगी छपाईमुळे अंक देखणा बनला आहे. पानांची संख्या वाढवली पाहिजे. जगभरातील सांस्कृतिक घटनांची दखल घ्यावी.

**–श्री. सुभाष इनामदार**
मुक्त पत्रकार, पुणे

- 'पांथस्थ' छानच आहे. ऑनलाईन पध्दतीने जगभर जास्तीतजास्त ठिकाणी पोचविण्याचा प्रयत्न करावा. 'शुभास्ते पंथानः'

**–श्री. श्यामसुंदर जोशी**
संचालक, ग्रंथसखा वाचनालय, बदलापूर



# सर्व जगाला खुणावणारी मध्यपूर्वेतील मायानगरी 'दुबई'

गायत्री गुर्जर गजभिये

दुबईची पर्यटनस्थळं किंवा तिथे पाहण्यासारखं काय, या विषयावर विचार करत असताना लक्षात आलं की, इथे अनुभवायला मिळणारी मिश्र संस्कृती आणि त्यातून पहायला मिळणारं बरंच काही हे जास्त सांगण्यासारखं आहे.

मला दुबईत येऊन अवघी तीन वर्षं होत आहेत, पण खरंच असं वाटतं की जगाबद्दलचा दृष्टिकोन बदललाय. 'केल्याने देशाटन'ची प्रचिती आल्यासारखी वाटते. इथे येईपर्यंत पुणं माझं सर्वस्व होतं. तिथेही निश्चितच खूप उत्तम मिळालं. आई-बाबांच्या डेक्कन कॉलेज मधल्या नोकरीमुळे भारतातल्या अनेक राज्यांमधले, मुख्यतः ओडिसा, कर्नाटकातले लोक जवळचे झाले. परदेशातून आलेल्या थाई-जपानी लोकांशीही भरपूर सख्य जमलं. पुढे आम्ही राहत असलेल्या वसाहतीत-इमारतीत तर शेजारी एक बंगाली, एक तमिळ, दोन केरळी, एक युपीचे असा छान अनुभव मिळाला. पण तरीही 'सर्वसमावेशक' या शब्दाची नवी ओळख मला दुबईनेच करून दिली. पूर्वीच्या सर्व भिन्नतेमध्ये अनेक प्रकारची ओळख दुबईनेच करून दिली. इथे येणाऱ्या-राहणाऱ्या लोकांमध्ये इतकं वैविध्य आहे की जे फार दुर्मिळ असावं. दुबई आपल्या मुंबईसारखीच लखलखणारी, चमचमणारी, नोकरीच्या अनेक संधींमुळे सर्व स्तरांमधल्या, अनेक देशांमधल्या लाखो लोकांना भुरळ घालणारी!

**'सर्वसमावेशक' या शब्दाची नवी ओळख मला दुबईनेच करून दिली. पूर्वीच्या सर्व भिन्नतेमध्ये अनेक प्रकारची ओळख दुबईनेच करून दिली. इथे येणाऱ्या-राहणाऱ्या लोकांमध्ये इतकं वैविध्य आहे की जे फार दुर्मिळ असावं. दुबई आपल्या मुंबईसारखीच लखलखणारी, चमचमणारी, नोकरीच्या अनेक संधींमुळे सर्व स्तरांमधल्या, अनेक देशांमधल्या लाखो लोकांना भुरळ घालणारी!**

आयुष्यात काहीतरी वेगळं अनुभवावं असं कायमच वाटत आलंय. त्यात स्वभाव मोकळा आणि बोलका असल्यामुळे कुठेही आपलं जमून जाईल, असा आत्मविश्वास. इथे आम्ही राहतो ती एक 'gated Community' आहे. दुबई प्रॉपर्टीज् ही गव्हर्नमेन्टच्या उपक्रमातून बांधलेली मोठी वसाहत. मध्य वस्तीपासून थोडी दूर, त्यामुळे गजबज नाही. पण समोरच भला मोठा मॉल. जीवनावश्यक नाही तर हौसमौजेची प्रत्येक गोष्ट, सोय इथे आहे. मग अजून काय लागतं असा प्रश्न काहींना पडतो. पण घरातले कपडे घालून भाजीला फोडणी देऊन झाल्यावर अचानक आठवलेली कोथिंबीर कोपऱ्यावरून आणायची सवय असणाऱ्या मला ही व्यवस्था थोडी अवघड वाटली. नीटनेटकं तयार होऊन मॉलमधल्या भल्या मोठ्या मार्केटमधून किराणा घेणं, काहीही घेणं. सुरवातीला गमतीदार आणि थोड्या दिवसांनी कंटाळवाणं वाटायला लागलं. आमच्या इथले शेजारी म्हणजे स्थानिक अमिराती, युरोपियन, काही इजिप्शियन, सीरियन आणि जे देश फक्त ऐकूनच माहित होते

अशा कितीतरी देशांमधले. कुणीच कुणाशी फारसं बोलत नाही की जास्त जवळीक साधत नाही, हे पाहून खूप एकाकी वाटलं. तोपर्यंत भारतीय लोकांची फारशी ओळख झाली नव्हती. लिफ्ट मध्ये 'हॅलो, हाऊ आर यू?' इतपतच जुजबी संवाद होत असे. संपूर्ण दुबई असंच असावं असा तेव्हा माझा समज झाला आणि 'याचसाठी केला होता का अट्टाहास' असं वाटून गेलं.

मग हळूहळू जरा सवय झाली, सेटल झाले. मुलांना घेऊन खाली पार्कमध्ये जायला लागले आणि तिथेच मला दुबईचा आतला चेहरा दिसायला लागला. माझी पहिली मैत्रीण मेरी आफ्रिकेच्या एका देशातली, आया म्हणून कामाला आलेली. हसरी, प्रेमळ, गुबगुबीत! आमची ओळख झाल्या दिवसापासून आजपर्यंत कधीही भेटलो की तिच्याकडून येणाऱ्या पॉझिटिव्ह व्हाईब्ज्‌नी इतकं बरं वाटतं! आशिया आणि आफ्रिका या संस्कृतीमधली साम्य आमच्या बोलण्यातून मला उमगली. 'दारं उघडी असणं' आणि येणाऱ्या-जाणाऱ्या, आजूबाजूच्या प्रत्येकाबद्दल आत्मियता हे ती सुद्धा खूप 'मिस' करीत होती. तिच्या इजिप्शियन मालक परिवारात खाण्यापिण्याच्या सवयी अगदी वेगळ्या होत्या. त्याबद्दलही तिला वाटणारी रुखरुख, एखादा पदार्थ दिल्यावर वाटणारं समाधान. तिच्याच ओळखीमुळे माझ्या आयुष्यात माझी श्रीलंकन आया आली. मला एका भारतीय शाळेत नोकरी मिळाल्यावर धाकट्या मुलीला सांभाळायला कुणीतरी हवंय, असं मेरीला सांगून ठेवलं होतं. तिनं माझ्याकडे तिला पाठवलं. पन्नाशीतली, जवळपास वीस वर्षं आखाती देशात आलेली, मुलांना आईकडे ठेवून भरपूर कष्ट उपसलेली बाई. कामात अत्यंत चोख आणि दिसायला अगदी माझ्या मावशी-काकूसारखी. तिचाआमचा संबंध गतजन्मीचाच असावा. तिने बाळाला तर छान सांभाळलंच, पण घरही, आणि आम्हालाही एकटं राहत असताना मोठ्या माणसांची कमी तिच्यामुळे भासत नाही. आता दोन वर्षांहून अधिक रोजचा सहवास आणि सहकार्य यामुळे दुबईतलं वास्तव्य खूप आरामदायी झालं. यापूर्वीही कायमच घरात मदतीला लोकं होती. पण इथल्या अरब मालकांच्या तालमीत तयार झालेले घरकाम करणारे लोक वेगळ्याच प्रोफेशनल रीतीने काम करतात. त्याचं मोलही तेवढंच द्यावं लागतं. पण जर स्वतः नोकरीसाठी बाहेर पडायचं असेल तर याला पर्याय नाही.

नोकरी लागल्यावर लक्षात आलं की शाळेपर्यंत पोहचायची सरळ व्यवस्था नाही. त्यात सातला सकाळी तिथे हजर राहायचं, म्हणजे वेळही फारसा नाही. पब्लिक ट्रान्सपोर्ट कनेक्टिव्हिटी उत्तम आहे. पण आमच्या भागात जरा कमी. मग काय? इथला दुसरा जीवनशैलीतला उच्च अनुभव प्रायव्हेट कॅब! इथे नियम कडक आहेत हे निश्चित, पण त्यातूनही वाटा काढणारे असतातच. एखाद्या अरबी स्थानिकाकडून स्पॉन्सरशिप मिळवून वाहतूक धंद्यामध्ये असणारा एक संपूर्ण वर्गच इथे सापडतो. प्रवाशांना घरपोच सेवा देणारे, बरेचदा महिना तत्त्वावर चालणारे हे चालक पाकिस्तान, बांगलादेश, भारतामधून आलेले. संपूर्ण वर्ष जवळपास मी बांगलादेशीच्या गाडीने शाळेत जात होते. त्याचं दिसणं आपल्यासारखं, संस्कृती, कुटुंब व्यवस्था यातही फार अंतर नाही. त्यामुळे खूप गप्पा व्हायच्या. नुसताच शेजारी असलेला तो देश जवळचा वाटायला लागला. पुढे कुणीतरी त्याच रूटवरची खासगी बससेवा सुचवली. ती सांभाळतात सात ते आठ पाकिस्तानी भाऊ. बोलण्यात अत्यंत अदब, वागण्यातही सौजन्य. रोज ज्या चांगुलपणाशी संबंध येतो तो खरा मानायचा का उगाचच राजकीय गुंत्यामध्ये अडकलेला कडवटपणा, 'कट्टरपणा'. संपूर्ण दुबईत भारतीय व पाकिस्तानी नागरिकांचा परस्पर स्नेह सतत दिसत राहतो, अनुभवायला मिळतो. खोल कुठेतरी अढी असेल, द्वेष असेल, खुनशी हेतूही असेल कदाचित. पण वरचेवर येणारा सामंजस्याचा भाव सोडून हे सगळं का खोदत बसायचं तेच कळत नाही?

आमच्या शाळेत भारतीय सोडून नेपाळी व फिलिपीनो लोक काम करतात. नेपाळी बायका दिसायला छान गोऱ्यापान, काही तरी घाऱ्याही! परकं असं कुणी वाटतच नाही. आपले संसार-मुलं सोडून आलेल्या या सगळ्या दिदी त्यांच्या कष्टाचं, जिद्दीचं कौतुक वाटतं. फिलिपीनो अधिकतर सेक्रेटरी वर्गात आढळतात. अत्यंत टापटीप, व्यवस्थितपणा, कायम केस, मेकप अप टू डेट. कामातही हुशार आणि कष्टाळू. त्यांचा संपूर्ण वावरच स्मार्ट असतो. प्रत्येक प्रकारच्या व्यक्तीकडून बरंच काही शिकायला मिळतं हे नक्कीच.

नेहमीच्या सवयीच्या बाहेर वावर करायला लागलं की अजूनच नवनवे अनुभव येतात. परवाच मी बागेत गेले असताना सीरियाची एक मैत्रीण झाली. त्यांच्या देशात आत्ता चालू असलेलं युद्ध, अस्थिरता, तिचं तिथे असलेलं घर, त्यांचा परिवार-खूप गप्पा झाल्या. नकाशावर पाहिलेले देश ज्यांच्या मुळे जिवंत होतात ते समोर आल्यावर खरंच 'वसुधैव कुटुंबकम्' का म्हणतात, हे उमगतं. सगळंच किती एकसारखं असतं. आम्ही सगळे इथे आपला देश सोडून काही आकांक्षा घेऊन आलेले. आमची मुलं, घरी असलेले म्हातारे आई-बाबा यांच्याबद्दल वाटणारी जबाबदारी, काळजी, आर्थिक स्थित्यंतरांमध्ये दुबईतही येणारे चढ-उताराचे अनुभव, कुणाशीतरी जवळीक-आपुलकी साधावी अशी इच्छा; पण तसं करणं हे इथे योग्य होईल का, ही साशंकता-सगळंच सारखं आहे.

आमच्या शाळेतली स्टाफ-रूम अधिकतर केरळी मंडळींनी भरलेली बाकी काही जणी गुजरात, दिल्लीच्या आहेतही. पण बहुमत मल्याळींना. केरळच्या समाजाचं एक छोटंसं प्रतीकरूपच पहायला मिळतं. त्यात ख्रिश्चन -मुस्लिम धर्माच्या सहकर्मचारी जास्त. पुण्यातही याआधी आमचे सर्व धर्मांचे मित्र-मैत्रिणी होते. येणं-जाणं होतं. पण दोन वर्ष, दिवसभर सतत एकत्र राहण्याचा, एकत्र काम करण्याचा अनुभव काही वेगळाच. स्वतःला पुढारलेले विचारी समजणाऱ्या आणि सर्वधर्म समावेशकतेचा पुरस्कार करणाऱ्या आपल्यासारख्या मंडळींमध्ये इतर जाती-जमाती-धर्मांच्या लोकांबद्दल काही गैरसमज, थोडी नाराजी, थोडा दुजाभाव हे असतातच. यावर उपाय म्हणजे खुल्या मनाने, मोकळेपणाने एकत्र येणं, काम करणं. त्यामुळे विरोध गैरसमज, जे काही असेल ते आपोआप गळून पडतं-पडावं.

वाळवंटाला मायानगरी करण्याचं स्वप्न पाहणारे इथले राज्यकर्ते. त्या स्वप्नाला सत्यात उतरवण्यासाठी अहोरात्र काम करणारे जवळपास दीडशे देशांतले तज्ज्ञ, त्यांचा कणा असणारे शिक्षित, स्किल्ड कर्मचारी अधिकतर विकसनशील देशातले. त्यातले असंख्य भारतीय आणि या सगळ्या वरच्या थराचं जगणं सुलभ करणारे, हवी ती सेवा अगदी चोखपणे पुरवणारे अनेक हात. यामुळे दुबई आज ताठ उभी आहे, जगभरातील लोकांना इथे येण्यासाठी भुरळ घालत आहे.

त्यातून निर्माण झालेली मिश्र संस्कृती अनुभवणं हा खरंच माझ्या आयुष्यातला टर्निंग पॉईंट म्हणावा लागेल. 'एकं सत्'ची प्रचिती देणारा आणि 'सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः' ही प्रार्थना खोलवर रूजवणारा!

संस्थेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त
श्री. प्रबोध वेखंडे यांची
सौ. मीनल जोशी यांनी घेतलेली मुलाखत

# “जंगोराईताड”

## आदिवासी विकास संस्था

## सामान्यांना, वंचितांना, अपेक्षितांना मदतीचा हात देणारी यंत्रणा



– प्रबोध वेखंडे

जंगोराईताड आदिवासी विकास संस्था मुख्यत्वेकरून सामाजिक बांधिलकी व समाजाप्रती कर्तव्यपूर्ती करण्याच्या दृष्टीने स्थापन झालेली संस्था आहे. श्री. प्रबोध चंद्रशेखर वेखंडे, जे शिक्षणाने एम.टेक. (कम्प्युटर सायन्स) आहेत, व्यवसायाने प्राध्यापक आहेत, आणि व्यासंगाने सिद्धहस्त ज्योतिषी आहेत. त्यांनी सन २०१८ मध्ये आपल्या नोकरीवर पाणी सोडून, जंगोराईताड विकास संस्था नावारूपास आणण्याचा चंग बांधला. २५ वर्षांचा शिक्षण क्षेत्रातला अनुभव व विनामूल्य ज्योतिषसल्ला ही त्यांची जमेची बाजू होती. गेल्या १५ वर्षांत त्यांच्या ज्योतिषाचे अनेकांना चमत्कारी अनुभव आलेले आहेत. त्यांच्याविषयी व जंगोराईताड आदिवासी विकास संस्था यांच्या कार्याविषयी जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी झालेला संवाद...

प्रश्न : **सर, जंगोराईताड आदिवासी विकास संस्था हिचे जाळे आपण आपल्या ज्योतिषाच्या ज्ञानातून विणले आहे, हे खरे आहे काय आणि हे कसे शक्य झाले?**

सर : हो, गेल्या अनेक वर्षांपासून मी विविध इंजिनिअरिंग कॉलेजेस मध्ये प्राध्यापक होतो, त्याचबरोबर सन २००४ पासून ज्योतिषाचे वर्ग ही निःशुल्क घेत आहे. दर रविवारी निःशुल्क ज्योतिष परामर्श व सल्लादान करत आहे. सुखवस्तू समाजात प्रचुर संसाधने आहेत, पण समस्यांचे समाधान नाही. ह्या उलट गरीबांकडे संसाधने नावालाही नाहीत म्हणून समाधान नाही. श्रीमंत भाग्यवान आहेत, पण समाधानी नाही आणि गरीब कमनशीबी आहे म्हणून समाधानी नाही!!! यावर उपाय एकच आहे. श्रीमंतांनी आपली ‘थोडी’ श्रीमंती दान करावी व आत्मीय समाधान प्राप्त करावे. गरिबांनी मिळालेल्या दानाचा योग्य उपयोग करून समाधान प्राप्त करावे. ज्योतिषी या नात्याने मी हाच संदेश देतो. भारतीया संस्कृतीत दानाचे अत्यंत महत्त्व आहे. कुंडलीवरून मी श्रीमंतांना योग्य दान काय राहील हे सांगतो व त्या करिता योग्य ‘गरीब’ ही शोधून देतो. योग्य दानाने व योग्य व्यक्तीला दिल्याने श्रीमंतांची समस्या सुटते तर गरिबाला जीवन नव्याने जगण्याची एक छोटीशी संधी प्राप्त होते. हा विचार ज्यांना पटला, आवडला आणि ज्यांनी ज्योतिषशास्त्रावर विश्वास ठेवला ते संस्थेशी जुळत गेले व अशा प्रकारे संस्थेने आपले कार्य सुरू ठेवले.

प्रश्न : **प्रामुख्याने संस्थेने कुठल्या क्षेत्रात कार्य केले आहे ?**

सर : आज संस्था १२(ए), ८०(ए) व आयएसओ ९०१-२०१५ असल्याने विविध क्षेत्रात कार्य करण्यास पात्र आहे. सदर वनवासी क्षेत्रात आदिवासी लोकांना पक्के संडास बांधून देणे, गावात वीज असावी म्हणून सौर उर्जेचा वापर करणे, गावातील जनावरांना पाण्याची टाकी बांधून देणे, गावात रोजगार प्राप्त व्हावा व उत्पन्न वाढावे म्हणून सवत्स गोदान (दुभती गायवासरू) करणे, गावातील शाळांना शैक्षणिक संसाधने जसे (कम्प्युटर, प्रिंटर इ.) किंवा पुस्तकांची अलमारी इ. शाळेला आतून-बाहेरून रंगरंगोटी करणे, गावातील महिलांना व मुलींना दिवाळी निमित्त नवीन साडी वा ड्रेस देणे, असे अनेक उपक्रम वनवासी क्षेत्रात करीत आहे.

प्रश्न : **सर, ‘वात्सल्यम्’ नावाचा उपक्रम आपल्या संस्थेद्वारा राबविला जातो आहे. या विषयी सांगाल का ?**

सर : वात्सल्यम् हा उपक्रम आमचा फार आवडता उपक्रम आहे. या उपक्रमात गर्भवती महिलांना गर्भधारणा झाल्या महिन्यापासून बाळंतपण झाल्यावर तीन महिन्यांपर्यंत सर्व प्रकारची मदत केली जाते. गर्भवती व तिच्या बाळास लागणारा सकस आहार, योग्य औषधी, वेळोवेळी लागणाऱ्या विविध चाचण्या, बाळंतपणानंतर बाळाला सकस आहार, औषधी, इतर टीके वगैरे साठी संस्था विनामूल्य मदत करीत आहे. वैद्यकीय क्षेत्रातील नामवंत डॉक्टर या कार्यात संस्थेला मदत करीत आहेत. गेल्या दोन वर्षांपासून नागपूर येथे हा उपक्रम यशस्वीपणे राबविला जात आहे. आजतागायत ३५ महिलांना याचा लाभ मिळाला आहे.

प्रश्न : **खरोखरच अभिनंदनाची बाब आहे. पण सर, या कार्यात काही**

**ठळक अनुभव सांगू शकाल?**

सर : गर्भवती महिला व तिच्या बाळाचे संगोपन करणे प्रत्येक वेळेसच चमत्कारी वाटते. पण ठळक म्हटले तर, आमच्या वात्सल्यम्च्या पहिल्या वर्षी, बाळंतपण सुखरूप झाल्यावर डॉक्टरांच्या लक्षात आले की बाळ क्लब फीटचा आहे. त्यावेळी संस्थेकडे विशेष पैसेही नव्हते. बाळ क्लब फिटचे आहे हे एकून सगळ्यांनाच वाईट वाटले. बाळाचे ऑपरेशन लागलीच करणे आवश्यक होते. संस्थेची तिजोरी रिकामी होती. बाळ-बाळंतिणीची पूर्ण जबाबदारी संस्थेची होती. पैसा उभा कसा करावा हा यक्षप्रश्न होता. नागपूरच्या टेकडी गणेशाला स्मरून माझ्या काही जुन्या विद्यार्थ्यांना फोन केला. ऑपरेशनला लागणारे ५० हजार चोवीस तासात उभे झाले!!! शल्यक्रिया यशस्वी झाली. आज मुलगा एक वर्षाचा आहे व स्वतःच्या पायावर उभा राहू शकतो आहे!!!

प्रश्न : **आम्ही ऐकले आहे की तिळे होण्याची घटना ही रंजक आहे, त्याविषयी थोडे...**

सर : हो, वात्सल्यम्च्या दुसऱ्या वर्षी, दुर्गम भागातूनही महिला येऊ लागल्या आहेत. सौ. नेहा आत्राम अशीच एक आदिवासी महिला वात्सल्यम् मध्ये आली. सौ. नेहा जेमतेम दहावी पास तर तिचा नवरा सातवी पास!! घरी अठरा विश्वे दारिद्र्य! यात हिला गर्भधारणा झाली!!! डॉक्टरांनी सोनोग्राफीमध्ये सांगितले की तिळे आहे. जिथे एका बाळाची सोय होऊ शकत नव्हती त्यात परमेश्वराने तिळे दिले!! माहेरच्या व सासरच्या मंडळींनी गर्भपात करण्याचा सल्ला दिला. तिच्या व आमच्या सुदैवानी तिला वात्सल्यम् विषयी माहिती होती. संस्थेने तिला पूर्ण मदत करण्याचे ठरविले. तिच्या सकस आहाराची व तिचे मनोधैर्य खचू नये याची विशेष काळजी घेतली गेली. डॉक्टरांचे प्रयत्न, सौ. नेहाचे धैर्य व परमेश्वराचे आशीर्वाद यामुळे सौ. नेहाने दोन गोंडस मुलींना व एका टुणटूणीत मुलाला जन्म दिला. मुलगा थोडा अशक्त असल्याने त्याला काही दिवस अतिदक्षता विभागात (आयसीयू) ठेवावे लागले. आता सौ. नेहा व तिची तिन्ही बाळे सुखरूप आहेत व संस्था त्यांना दोन वर्षांची पूर्ण औषधी देणार आहे.

प्रश्न : **अरे व्वा! वात्सल्यममुळे खरोखरच वंचितांना लाभ मिळत आहे, पण कुठल्याही चांगल्या कार्याला आर्थिक मदत लागते. ही बाब कशी सांभाळली जाते ?**

सर : या बाबतीत व्यक्तिशः मी भाग्यवान आहे. आपला देश प्रगतिशील आहे. आपले सरकार जरी गरीब असले तरी भारतीय गरीब नाहीत!!! त्यातही एवढी वर्षे प्रामाणिकपणे प्राध्यापकी केली असल्याने तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांमुळे श्रीमंतच असता! गेली २५ वर्ष इंजिनिअरिंग कॉलेजला कम्प्युटर सायन्स शिकवल्यामुळे माझे अनेक विद्याथी विदेशात सुस्थितीत आहेत. हे माझे भाग्यच आहे की ते आजही माझ्या संपर्कात आहेत. त्यांना आपल्या सरांच्या कार्यात मदत करावीशी वाटते हे माझे भाग्यच आहे. आज संस्थेला केवळ माझ्या विद्यार्थ्यांकडूनच नव्हे तर समाजातील इतरही घटकांकडून मदत हळू-हळू प्राप्त होऊ लागली आहे. आमची सर्वांना व विशेषकरून विदेशातील लोकांना कळकळीची करबद्ध विनंती आहे की संस्थेला मदत करा! समाजात गरीबी फार आहे आणि गरीब तर फारच आहेत. शक्य असल्यास एका गर्भवती महिलेला बाळंतपणासाठी मदतीचा हात द्या.

प्रश्न : **वात्सल्यम् या उपक्रमात कोणालाही मदत करावयाची असल्यास कशा प्रकारे करू शकतो ?**

सर : वात्यल्यम् योजनेअंतर्गत गर्भवती महिला दत्तक घेण्याची योजना आहे. साधारणपणे एक गर्भवती महिला आपण दत्तक घेऊन तिच्या बाळाची व महिलेची काळजी वाहून आपण स्वतःला मदत करू शकता. दत्तक घेतलेल्या महिलेविषयी, तिच्या आर्थिक, सामाजिक स्थितीविषयी, तिचा आधार क्रमांक व उपलब्ध असल्यास फोन नंबर वगैरे संपूर्ण माहिती आपणांस कळविण्यात येते. गर्भवती महिलेच्या वेळो-वेळी झालेल्या विविध चाचण्या, त्यांचे रिपोर्ट, औषधी व इतर माहिती आपल्याला मेलद्वारे लागलीच पाठविण्यात येईल. दर वेळेस डॉक्टरांचे मत देखील आपल्याला कळविण्यात येईल. बाळंतपण झाल्यावर तिचे व बाळाचे फोटो व बाळाच्या प्रकृतीविषयी आपल्याला लागलीच कळविण्यात येईल. आपण कधीही महिलेशी वा तिच्या पतीशी थेट संपर्क साधून संस्थेकडून पुरविण्यात येणाऱ्या औषधाविषयी जाणून घेऊ शकता. साधारणपणे गर्भवती महिलेस ८ महिने व बाळंतपणानंतर ३ महिने बाळास संस्था मदत करते. १२ महिने ही मदत चालते. दरमहा दोन हजार (२०००.००) या प्रमाणे चोवीस हजार (२४,०००.००) रुपये एका गर्भवती महिलेला दत्तक घेण्यास लागतात. आपण ही रक्कम दरमहा, दर सहा महिन्यांनी वा एकरकमी सुद्धा देऊ शकता. ही रक्कम आपण बँकेमध्ये सरळ जमा करू शकता. बँकेची माहिती पुढील प्रमाणे :

SBI, Congress Nagar Nagpur.
Account Number : 35225435926
IFSC Code : SBIN0070602

किंवा www.danamkaroti.org या संकेतस्थळावर जाऊनही आपण याविषयी अधिक जाणून घेऊ शकता.

प्रश्न : **सर, मनसर गावातील ग्रामस्वच्छता व तलाव-स्वच्छता उपक्रमाविषयी थोडक्यात...**

सर : अरे हो, संस्थेने मागील म्हणजे मार्च २०१८ पासून रामटेक जवळील मनसर गावातील एक वॉर्ड स्वच्छतेसाठी दत्तक घेतला आहे. या गावात जवळपास ३०० वर्षे जुना एक तलाव आहे. तलावाजवळील वस्ती आपल्या घरचा कचरा तलावात टाकीत असे. त्यामुळे तलाव प्रदूषित झाला होता. गावात स्वच्छतेची सुरुवात व्हावी म्हणून संस्थेने भारतातील प्लास्टिक क्षेत्रातील एका अग्रगण्य नामांकित कंपनीशी चर्चा केली. सुप्रीम इंडस्ट्रीज् हे प्लास्टिक क्षेत्रातील दबदबा असलेलं नाव आहे. या कंपनीच्या अधिकाऱ्यांना प्रदूषण टाळण्यासाठी मदत करावी अशी आम्ही मदत मागितली. कंपनीला आमची योजना आवडली व त्यांच्यातर्फे तलाव उपसण्यापासून, प्रत्येक घरी कचरा टाकण्यासाठी १०लिटरची सुरेख कचरापेटी (डस्टबिन) पुरविण्यात आली. संस्थेने आज वॉर्डातील प्रत्येक घरातून कचरा उचलण्यासाठी एका कार्यकर्त्याची नेमणूक केली आहे. दररोज वॉर्डातून संस्थेची गाडी घरा-घरातून कचरा जमा करते व त्याची योग्य विल्हेवाट लावते. हे कार्य आता पूर्ण मनसर गावात करण्याचा बेत आहे. पाहूया सुप्रीम साथ देते का!!!

**पत्ता** : **जंगोराईताड आदिवासी विकास संस्था** : **३०६, लक्ष्मीनगर, बास्केटबॉल मैदानजवळ, नागपूर. फोन** :**९१-७१२-२४३०८९५**
**मो. ९२२५२२०८९५** ✻ **ई-मेल**: javasnagpur@gmail.com
**वेबसाईट** : www.danamkaroti.org

Vishwa Panthastha - RNI CR No. MAHBIL/2016/69261

crueltyfree andvegan



• Tooth Decay • Bleeding Gums • Swollen Gums

# It is better to be safe than 'sorry' !!

Prevent all Disorders of Teeth and Gums by using regularly Vicco Vajradanti Paste which is made by proper blending of the herbs and barks of 18 saviour medicinal plants in the Nature and does not contain any harmful chemicals !

Like us on f / ViccoLabs

Experience the power of Vicco Vajradanti




Free with Vicco Vajradanti Herbal Toothpaste




No 5 O' Clock Shadow

Vicco Turmeric Multipurpose Shaving Cream produces rich moisturising foam for close shaving and a pleasant fragrance to give you a great refreshing experience. Good lubricating quality gives superior gliding action-a closer, more comfortable shave. It improves natural health of the skin adding luster to the complexion.

VICCO® VAJRADANTI

Herbal Toothpaste / Toothpowder

For Strong Gums And Beautiful Healthy Teeth

Go natural

www.viccolabs.com email : gkp@viccolabs.com

18 HERBS & BARKS

|*Offer valid till stocks last

|*Stocks also available without offer

CPADV-2018-000054